# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in

## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/१२५२ दिनांक : १६ नोव्हेंबर, २०११

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय : विद्यापीठ परीक्षांचे काम - बंधनाविषयी....**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंबंधी आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२(५)(ग) अन्वये परीक्षा संबंधीचे काम महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर सेवकांवर बंधनकारक आहे. काही शिक्षक प्राश्निक, परीक्षक, पर्यवेक्षक इ. परीक्षेची कामे काही वेळा करत नाहीत अथवा असमर्थता कळवितात. त्याचप्रमाणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या विविध परीक्षांचे निकाल महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ७२ अनुसार ठराविक मुदतीत जाहीर करणे आवश्यक असल्याचे आपणांस विदित आहेच. याबाबत परीक्षांचे निकाल मुदतीनंतर लागत असल्यामुळे महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ रोजी परिपत्रक काढून असे कळविले आहे की, **"परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी जे अध्यापक टाळाटाळ करतील किंवा जी महाविद्यालये त्यांच्याकडील अध्यापकांना उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामासाठी महाविद्यालयातून मुक्त करणार नाहीत अशा अध्यापक/महाविद्यालयांच्या विरोधात विद्यापीठांनी कारवाई करावी."**

विद्यापीठाने परीक्षेच्या कामासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांना काही वेळेस काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षेचे काम करण्यास परवानगी देणे संबंधित महाविद्यालयांना शक्य होत नसल्याने त्याचा परिणाम परीक्षा आयोजन व तत्संबंधी बाबींवर होतो. याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेले निर्णय संदर्भ क्रमांक परीक्षा/समन्वय/२२३९, दिनांक ११ ऑगस्ट, २००१ च्या पत्राने आपणांस कळविले आहे. यासंबधी सर्व बाबींचा विचार करुन, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस पुन:श्च पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. परीक्षेच्या कामासाठी प्राश्निक, परीक्षक, नियामक, वरिष्ठ पर्यवेक्षक इ. प्रकारच्या नियुक्त्या विद्यापीठाकडून करण्यात येत असतात. काही शिक्षकांच्या एकाच वेळेस एकाहून जास्त प्रकारच्या परीक्षा विषयक कामासाठी नियुक्त्या झाल्या असल्यास, अशा वेळेस खाली नमूद केलेल्या परीक्षाविषयक कामाच्या प्राधान्यक्रमानुसार संबंधित शिक्षकांनी काम करावे.

अ. प्राश्निक (Paper setter) म्हणून केलेली नियुक्ती.
ब. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी परीक्षक म्हणून केलेली नियुक्ती.
क. उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्यासाठी परीक्षक/नियामक म्हणून केलेली नियुक्ती.
ड. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून महाविद्यालयाने केलेली नियुक्ती.
इ. विशेष वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून केलेली नियुक्ती.
ई. दक्षता समितीवरील अध्यक्ष/सदस्य म्हणून केलेली नियुक्ती.
उ. बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून केलेली नियुक्ती.
ऊ. कनिष्ठ पर्यवेक्षक म्हणून महाविद्यालयाने केलेली नियुक्ती.

मा.प्राचार्य/संचालक/विद्यापीठ शैक्षणिक विभागप्रमुख यांनी वरील प्राधान्यक्रम लक्षात घेऊन संबंधित शिक्षक/शिक्षकेतर सेवकांना विद्यापीठ परीक्षेच्या कामासाठी परवानगी द्यावी. संबंधित शिक्षक/शिक्षकेतर सेवकांनी वरील प्राधान्यक्रम लक्षात घेऊन त्यांच्या महाविद्यालयाची/संस्थेची/ विद्यापीठ विभागाची परवानगी घेऊन परीक्षेचे काम करावे.

२. कनिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती ही किमान शिक्षक किंवा वर्ग ३ मधील सेवक अथवा पदवीधर (पुणे विद्यापीठाचे परीक्षार्थी नसलेले) असावी.

३. एखाद्या व्यक्तीने त्याच संस्थेच्या दुस-या महाविद्यालयात बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून काम स्वीकारु नये.

४. **प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक यांचे "Father, mother, wife, husband, son, daughter, daughter-in-law, brother, sister, first cousin and their children." हे नातेवाईक पदवी परीक्षेला बसले असतील तर ते त्या विद्याशाखेतील पदवी परीक्षेचे काम करण्यास अपात्र ठरतात. तथापि त्यांनी त्या विद्याशाखेतील पदव्युत्तर परीक्षेचे काम करण्यास हरकत नाही. तसेच त्यांचे सदर नातेवाईक पदव्युत्तर परीक्षेला बसले असतील तर ते त्या विद्याशाखेतील पदव्युत्तर परीक्षेचे काम करण्यास अपात्र ठरतात. तथापि त्यांनी त्या विद्याशाखेतील पदवी परीक्षेचे काम करण्यास हरकत नाही.**

५. एका व्यक्तीने एका वेळेस विद्यापीठाचे एकच काम करावे. तसेच त्या कालावधीत विद्यापीठाचे इतर कोणतेही काम स्वीकारले नसल्यासंबंधीचे हमीपत्र द्यावे.

६. एखाद्या शिक्षकाची नियुक्ती विशेष वरिष्ठ पर्यवेक्षक/वरिष्ठ पर्यवेक्षक/दक्षता समिती अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून केलेली असल्यास सदर नियुक्तीच्या पत्राची प्रत संबंधित महाविद्यालयाला पाठविण्यात येईल.

७. विशेष रजेवर, प्रतिनियुक्तीवर, अभ्यास रजेवर असलेल्या शिक्षकाने सर्वसाधारणपणे विद्यापीठाचे काम स्वीकारु नये. परंतु अशा कालावधीत शिक्षक ज्यांच्याकडे कार्यरत असतील अशा व्यक्तीच्या/संस्थेच्या संमतीने असे काम स्वीकारण्यास हरकत नाही.

८. महाविद्यालयाबाहेरील विद्यापीठ परीक्षेच्या वेगवेगळया कामासाठी एका महाविद्यालयातील एका वेळेस साधारणत: ३० ते ४० टक्के पर्यंत शिक्षक/शिक्षकेतर सेवक विद्यापीठ नियुक्त करेल.

९. एखाद्या वेळेस केंद्रीय मूल्यमापनाच्या कामाचा कालावधी वाढल्यास, संबंधित केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे संचालक, त्या शिक्षकास अधिकच्या कालावधीचे पत्र देतील व त्या पत्राची प्रत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि परीक्षा नियंत्रक यांना पाठवतील.

तरी आपणांस विनंती की, वरील निर्णयांची दखल घेऊन सदरचे निर्णय सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावेत. विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षेचे आयोजन ही आपणा सर्वांची वैयक्तिक व सांघिक स्वरुपाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित रक्षणासाठी आपणा सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. मला विश्वास आहे की, आपण आणि आपले संबंधित शिक्षक व शिक्षकेतर सहकारी नेहमी सहकार्य करीत आलेले आहात. तसेच वरील निर्णयांची दखल घेऊन विद्यापीठ परीक्षेच्या कामात यापुढेही आपण आपले सहकार्य देत राहाल.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक

**प्रत माहितीसाठी सादर :**

१. मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा
२. मा.संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
३. मा.वित्त व लेखा अधिकारी
४. मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सहायक

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :**

१. परीक्षा विभागातील सर्व उपकुलसचिव
२. परीक्षा विभागातील सर्व सहायक कुलसचिव
३. परीक्षा विभागातील सर्व कक्षाधिकारी